## बांबू उपक्रमाची निर्देशिका (Bamboo Enterprise Directory)

बांबू मित्रांनो,

महाराष्ट्रातील बांबू उत्पादक शेतकरी गट/बांबू कारागीर/सहकारी संस्था/बचत गट/ बांबू संस्था/उपक्रम आणि बांबू सल्लागार यांची माहिती www.mahabamboofoundation.org या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत.

'महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान'(Maharashtra Bamboo Promotion Foundation (MBPF) यांच्या संकेतस्थळाचे अनावरण जागतीक बांबू दिनी म्हणजेच दि. १८ सप्टेंबर २०२० रोजी करण्यात आल्याचे जाहिर करण्यात आनंद वाटतो. संकेतस्थळ टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येईल.

सदर संकेतस्थळावर आम्ही महाराष्ट्रातील बांबू व्यावसायीकांना/कारागीरांना तसेच बांबूशी संबंधीत इतरांना आपली माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याकरीता बांबू उपक्रमाची निर्देशिका प्रसिद्ध करण्याचे प्रयोजन आहे. ज्यामुळे सदर बांबू प्रेमींना आपली माहिती सर्वदूर पोहचविण्यास मदत होईल व त्यायोगे त्यांचे उत्पन्न/व्यवसाय वाढविण्यास भरीव मदत होईल.

बांबू उत्पादक शेतकरी गटांना, कारागीरांना, संस्थांना, बचत गटांना व इतर खाजगी उद्योगांना या संधीचा उपयोग करून घेता येईल. बांबू सल्लागार व तसेच बांबू तज्ञ हे देखील आपली माहिती पाठवू शकतात. काही तांत्रिक करणांमुळे शेतकरी/कारागीर यांची व्यक्तिगत माहिती देणे सध्या शक्य होणार नाही.

वरील सर्व गटांतील स्वारस्य असलेल्यांनी इंग्रजी अथवा मराठीतून अर्ज सादर करावेत. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. प्रत्येक अर्जासोबत आपल्या कामासंबंधी माहिती आणि दोन डिजीटल फोटो जोडू शकता. सध्या फक्त महाराष्ट्र राज्यातील व्यक्ति/संस्था यांचेकडून प्राप्त झालेली माहिती स्विकारण्यात येत आहे.

कोणतेही कारण न देता माहिती प्रसिद्ध करणे किंवा न करणे तसेच माहितीची खातरजमा/संपादन करण्याचे अधिकार 'महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान'(MBPF) राखून ठेवत आहे.

माहिती प्रसिद्धी करीता जून २०२१ पर्यंत कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

आपले इंग्रजीत किंवा मराठीतील अर्ज (टंकलिखित किंवा हस्तलिखित) **खालील ई—मेल पत्यावर पाठवावेत: teammbpf@gmail.com**

अधिक माहितीकरीता श्री. दिनेश मळेकर(प्रशासकीय अधिकारी) यांना भ्रमणध्वनी क्र.९८६९४०७६३६ येथे संपर्क करावा.

( व्ही. गिरीराज )
मुख्य कार्यकारी अधिकारी